| Roll No. | | | | | | | | | | | | Serial No. of Q. C. A. B. |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|

ಒಟ್ಟು ಪ್ರಶ್ನೆಗಳ ಸಂಖ್ಯೆ : 56 ] [ ಒಟ್ಟು ಮುದ್ರಿತ ಪುಟಗಳ ಸಂಖ್ಯೆ : 24

Total No. of Questions : 56 ] [ Total No. of Printed Pages : 24

**ಸಂಕೇತ ಸಂಖ್ಯೆ : 85-M** **ವಿಷಯ : ಸಮಾಜ ವಿಜ್ಞಾನ**

**Code No. : 85-M** **Subject : SOCIAL SCIENCE**

( ಮರಾಠಿ ಭಾಷಾಂತರ / Marathi Version )

ದಿನಾಂಕ : 16. 04. 2012 ] [ Date : 16. 04. 2012

ಸಮಯ : ಬೆಳಿಗ್ಗೆ 10-30 ರಿಂದ ಮಧ್ಯಾಹ್ನ 1-45 ರವರೆಗೆ ] [ Time : 10-30 A.M. to 1-45 P.M.

ಪರಮಾವಧಿ ಅಂಕಗಳು : 100 ] [ Max. Marks : 100

**FOR OFFICE USE ONLY**

| Q. No. | Marks | Q. No. | Marks | Q. No. | Marks | Q. No. | Marks | Q. No. | Marks |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1. | | 14. | | 27. | | 40. | | 53. | |
| 2. | | 15. | | 28. | | 41. | | 54. | |
| 3. | | 16. | | 29. | | 42. | | 55. | |
| 4. | | 17. | | 30. | | 43. | | 56. | |
| 5. | | 18. | | 31. | | 44. | | × | |
| 6. | | 19. | | 32. | | 45. | | × | |
| 7. | | 20. | | 33. | | 46. | | × | |
| 8. | | 21. | | 34. | | 47. | | × | |
| 9. | | 22. | | 35. | | 48. | | × | |
| 10. | | 23. | | 36. | | 49. | | × | |
| 11. | | 24. | | 37. | | 50. | | × | |
| 12. | | 25. | | 38. | | 51. | | × | |
| 13. | | 26. | | 39. | | 52. | | × | |
| | | | | | | | | ***Total Marks*** | |

| Total Marks in words | | Grand Total | |
|---|---|---|---|

| | | | |
|---|---|---|---|
| 1. ✓ | | | |
| 2. ✓ | | ✓ | ✓ |
| *Signature of Evaluators* | *Registration No.* | *Signature of the Deputy Chief* | *Signature of the Room Invigilator* |

208000 [ Turn over

**सामान्य सूचना :**

i) या प्रश्नोत्तर पत्रिकेत बहुपर्यायी व वस्तुनिष्ठ असे एकूण 56 प्रश्न आहेत.

ii) प्रत्येक बहुपर्यायी प्रश्नांच्या उत्तरासाठी दिलेल्या जागेतच उत्तर, संकेताक्षरासह उत्तर पत्रिकेत लिहावे.

iii) वस्तुनिष्ठ प्रश्नांच्या उत्तरासाठी पुरेशी जागा दिलेली आहे त्याच ठिकाणी उत्तरे लिहिणे आवश्यक आहे.

iv) बहुपर्यायी आणि वस्तुनिष्ठ प्रश्नांसमोर दिलेल्या सुचने प्रमाणे लिहावे.

v) विद्यार्थांनी प्रश्नांची उत्तरे पेन्सीलने लिहू नयेत लिहिल्यास त्या उत्तरांना गुण दिले जाणार नाहीत. ( नकाशा व्यतिरिक्त ).

vi) या प्रश्नोत्तर पत्रिकेत दिलेल्या बहुपर्यायी, रिकाम्या जागा भरा, जोड्या जुळवा या सारख्या प्रश्नांची उत्तरे लिहिताना खाडाखोड किंवा खाणाखुणा करु नयेत, तसे केल्यास त्या उत्तरांना गुण दिले जाणार नाहीत.

vii) विद्यार्थांना पंधरा मिनिटांचा जास्त वेळ देण्यात आला आहे त्याचा उपयोग शांतपणे प्रश्नपत्रिका वाचण्यासाठी करावयाचा आहे.

I. खाली दिलेल्या बहुपर्यायी किंवा अपूर्ण वाक्यांशाला **चार** पर्यायी उत्तरे दिलेली आहेत. त्यापैकी योग्य उत्तर निवडून उत्तर लिहिण्यासाठी दिलेल्या जागेतच लिहा : $15 \times 1 = 15$

1. दुसऱ्या महायुद्धात दोस्त राष्ट्रांच्या विजयाच्या शिल्पकारांची योग्य यादी

(A) चर्चील, ट्रूमन, स्टॅलिन, डी० गॉल

(B) हिटलर, लेनीन, डी० गॉल, स्टॅलिन

(C) ट्रूमन, चर्चील, स्टॅलिन, रूझवेल्ट

(D) चर्चील, लेनीन, स्टॅलिन, डी० गॉल.

उत्तर : ____________________

2. महलवारी पद्धतीचे मुख्य वैशिष्ट काय ?

(A) जमीनिच्या प्रमाणावर कराची देय रक्कम ठरवीली जात असे

(B) जमीनिच्या सकसतेवर कर आकारला जाई

(C) कर भरण्याची जबाबदारी महलदार व शेतकरी या दोघांचीही होती

(D) शेतीला पाणी पुरवठ्याच्या उपलब्धतेनुसार कर ठरविला जात असे.

उत्तर : ____________________

3. संगोळी रायण्णाने सशस्त्र सैनिकांचे पथक तयार करून ब्रिटिशांविरुद्ध लढा सुरु केला कारण

(A) ब्रिटिशांचा बदला घेण्यासाठी

(B) ब्रिटिशांना भारतातून हाकलून देण्यासाठी

(C) कित्तूरचे राज्य काबीज करण्यासाठी

(D) राणी चन्नम्माच्या दत्तक पुत्राला कित्तूरच्या गादीवर बसविण्यासाठी.

उत्तर : ____________________

4. स्वातंत्र्योत्तर भारताच्या इतिहासात सरदार वल्लभभाई पटेल सदैव स्मरणात राहतील कारण

(A) ते भारताचे पहिले गृहमंत्री होते

(B) त्यांनी भारतातील संस्थानांचे भारतीय संघराज्यात विलीनीकरण केले

(C) गोवा मुक्तीसाठी हातभार लावला

(D) राज्यांची पुनर्रचना केली.

उत्तर : ____________________

5. रशियाच्या आर्थिक प्रगतीत स्टॅलिन चे योगदान या साठी महत्वाचे आहे.

(A) पंचवार्षिक योजनांची आखणी ( सुरुवात ) केली

(B) राजेशाहीचा शेवट केला

(C) रशियाची सैनिकी ताकत वाढविली

(D) हुकुमशाहीची सुरुवात केली.

उत्तर : ____________________

6. इतर धर्माबद्दल असहिष्णुतेचे धोरण म्हणजे

(A) प्रांतीयवाद

(B) समाजवाद

(C) उदारमतवाद

(D) जातीयवाद.

उत्तर : ____________________

7. भारताचा 'जावा' आहे

(A) मुंबई

(B) राणीगंज

(C) गोरखपूर

(D) छोटानागपुर.

उत्तर : ____________________

8. वेठ बिगार पद्धत ( Bonded labour ) या वर्षी रद्द करण्यात आली.

(A) इ० स० 1972

(B) इ० स० 1976

(C) इ० स० 1978

(D) इ० स० 1982.

उत्तर : ____________________

9. घरगुती उद्योगधंद्याना असेही म्हटले जाते

(A) कुटीरोद्योग

(B) उत्पादक उद्योगधंदे

(C) स्थानिक उद्योगधंदे

(D) लघु उद्योगधंदे.

उत्तर : ____________________

10. पश्चिम घाटामुळे भारताच्या हवामानावर असा परिणाम होतो

(A) पश्चिम घाट घनदाट अरण्यांच्या वाढीला मदत करतात

(B) आकर्षक थंड हवेची ठिकाणे उपलब्ध आहेत

(C) नैऋत्य मान्सून वारे अडविल्यामुळे पुष्कळ पाऊस पडतो

(D) जंगली प्राण्यांचे आश्रयस्थान.

उत्तर : ____________________

11. मान्सून अरण्यांचे एक वैशिष्ट्य

(A) येथील झाडे वर्षभर हिरवीगार असतात

(B) उन्हाळ्याच्या सुरुवातीला झाडांची पाने गळून पडतात

(C) येथील झाडांच्या फांद्याना मुळे ( पारंब्या ) लोंबकळतात

(D) झाडे खुरटी असून मूळे खोलवर गेलेली असतात.

उत्तर : ______________________________

12. पेट्रोलला 'द्रवरूप सोने' असे म्हटले जाते

(A) ते सोन्याप्रमाणे चमकते

(B) याचा उपयोग सर्व आर्थिक व्यवहारात केला जातो

(C) याची किंमत सोन्यापेक्षा जास्त आहे

(D) हा अत्यंत ज्वालाग्रही पदार्थ आहे.

उत्तर : ______________________________

13. भारताच्या सध्याच्या संविधान ( घटना ) रचनेच्या दृष्टीने महत्वाचा कायदा

(A) रेग्युलेटिंग ॲक्ट

(B) पिटस इंडिया ॲक्ट

(C) मिंटो-मोर्ले सुधारणा कायदा

(D) 1935 चा गव्हर्नमेंट ऑफ इंडिया ॲक्ट.

उत्तर : ______________________________

14. लोकायुक्तांची नेमणूक करण्याचा उद्देश

(A) भ्रष्टाचाराला आळा घालण्यासाठी (B) चोरटी आयात रोखण्यासाठी

(C) हुंडा पद्धतीला आळा घालण्यासाठी (D) दारिद्र्याचे निर्मूलन करण्यासाठी.

उत्तर : ____________________

15. इ० स० 1975 च्या जैविक शस्त्रास्त्र बंदी कराराचा मुख्य उद्देश

(A) बाह्यावकाशात व समुद्रात अण्वस्त्र चाचणी बंदी घालण्यासाठी

(B) बाह्यावकाशात लष्करी हालचालीना प्रतीबंध घालण्यासाठी

(C) इतर देशाना अण्वस्त्र पुरविण्यावर प्रतीबंध घालण्यासाठी

(D) जैविक शस्त्रास्त्रांची निर्मिती करणे व त्याचा साठा करणे यावर प्रतिबंध घालण्यासाठी.

उत्तर : ____________________

II. रिकाम्या जागा योग्य उत्तरांनी भरा : 5 × 1 = 5

16. 'फ्रेंच ईस्ट इंडिया' कंपनीची स्थापना .................................................. या वर्षी झाली.

17. प्राचीन मेसोपोटेमिया म्हणजे आजचा .................................................. होय.

18. खेड्यातील महिलांच्या सुधारणेसाठी .................................................. ही योजना अंमलात आणली गेली आहे.

19. कर्नाटकातील सर्वात जास्त पाऊस पडणारे ठिकाण .................................................. हे होय.

20. सरकारने लोकांना अत्यावश्यक वस्तुंचा पुरवठा करण्यासाठी .................................................. .................................................. दुकाने निर्माण केली आहेत.

III. 21. *A* व *B* यादीतील योग्य जोड्या जुळवून उत्तरे खाली दिलेल्या रकाण्यात लिहा : 5 × 1 = 5

| *A* | | *B* | |
|---|---|---|---|
| (a) | आर्य समाज | (i) | राजा राममोहन रॉय |
| (b) | इंडियन कौन्सील ॲक्ट | (ii) | ताराबाई शिंदे |
| (c) | ब्राम्हो समाज | (iii) | मिंटो–मोर्ले |
| (d) | स्त्री–पुरुष तुलना | (iv) | जातीवर आधारित मतदार संघ |
| (e) | पहिला गव्हर्नर जनरल | (v) | दयानंद सरस्वती |
| | | (vi) | डॉ० बी० आर० आंबेडकर |
| | | (vii) | वॉरन हेस्टींग्स |
| | | (viii) | स्पर्धात्मक परिक्षा |

उत्तर : a) ______________________

b) ______________________

c) ______________________

d) ______________________

e) ______________________

IV. खालील प्रश्नांची प्रत्येकी **एका** वाक्यात उत्तरे लिहा : 9 × 1 = 9

22. फ्रँकलिन डी॰ रुझवेल्ट ने 'नवा करार' ( New Deal ) ही योजना का आखली ?

23. 'पंजाबचा सिंह' असे कोणाला म्हटले जाते ?

24. संयुक्त राष्ट्रसंघाचे ( UNO ) मुख्य कार्यालय कोठे आहे ?

25. संयुक्त राष्ट्रसंघाने 'मानवी हक्कांची' घोषणा केंव्हा केली ?

26. 'माईन काम्फ' ( माझा लढा ) हे पुस्तक कोणी लिहिले ?

27. भारतातील सर्वात जुने आणि अजूनही सुरु असलेले वृत्तपत्र कोणते ?

28. 'हरित क्रांती' म्हणजे काय ?

29. भारताचा राष्ट्रीय पक्षी कोणता ?

30. हळ्ळीच्या काळात सार्कच्या कार्यात खिळ बसण्याचे कारण काय ?

V. खालील प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी **दोन** वाक्यात लिहा : 16 × 2 = 32

31. तिसऱ्या अँग्लो-म्हैसूर युद्धानंतर टिपूच्या साम्राज्याला उतरती कळा लागली. का ?

32. ईसूर मधील चलेजाव चळवळ थोडी वेगळी होती. कशी ते लिहा.

33. निर्वासितांची समस्या सोडविण्यासाठी सरकारने कोणती पाउले उचलली आहेत ?

34. शेषाद्री अय्यर कोणत्या सुधारणा केल्या ?

35. दुसऱ्या आखाती युद्धाचे कारण काय ? त्याचा परिणाम काय झाला ?

36. इंग्रजी शिक्षणामुळे भारतीयांच्यात राष्ट्रीयत्वाची भावना कशी निर्माण झाली ?

37. हुंडा म्हणजे काय ? हुंडा प्रतिबंधक कायदा केंव्हा अमलात आला ?

38. युरोपियन समुदाय म्हणजे काय ? या समुदायाचे महत्वपूर्ण कार्य कोणते ?

39. चीनी आक्रमणानंतरही भारताने चीनशी मैत्रीपूर्ण संबंध ठेवण्याचा प्रयत्न केला आहे हे तुम्ही कसे म्हणू शकता ?

40. पूर्व किनारपट्टी व पश्चिम किनारपट्टी यातील फरक स्पष्ट करा.

41. कोणत्या खनिजात भारताची मक्तेदारी आहे ? या खनिजाचा उपयोग कशासाठी केला जातो ?

42. सिमेंटचा वापर देशाचा दर्जा दर्शवितो. कसे ते सांगा.

43. भूप्रदेशांतर्गत जलमार्गांची अधोगती का होत आहे ?

44. राष्ट्रसंघ ( League of Nations ) आपले उद्दीष्ट साध्य करण्यास कसा अपयशी ठरला ?

45. उद्योगधंदे कृषी व्यवसायाच्या विकासाला कसे कारणीभूत ठरतात ?

46. चौथी पंचवार्षिक योजना शेती व्यवसायाच्या विकासाबाबतीत का अपयशी ठरली ?

VI. खालील प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी **सहा** वाक्यात लिहा : 6 × 3 = 18

47. मातीची धुप रोखण्यासाठी कोणत्या योजना हाती घेण्यात आल्या आहेत ?

48. संयुक्त शेती म्हणजे काय ? या शेतीची मुख्य वैशिष्ट्ये कोणती ?

49. प्राथमिक शाळेकडे मुलांना आकर्षित करण्यासाठी सरकारने कोणत्या योजना केल्या आहेत ?

50. पोर्तुगीजांच्या ऱ्हासाची कारणे कोणती ?

51. 1857 च्या बंडाच्या अपयशाची कारणे कोणती ते लिहा.

52. पंचवार्षिक योजनांच्या सुरुवातीच्या काळापासून भारताला प्रतिकूल रकमेच्या शिल्लकीला ( Adverse balance of payment ) तोंड द्यावे लागत आहे का ?

VII. खालील प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी **आठ** वाक्यात लिहा : 3 × 4 = 12

53. राष्ट्रीय स्वातंत्र्य लक्ष्यात नेताजी सुभाषचंद्राची भूमिका स्पष्ट करा.

54. भारत आणि पाकिस्तानचे संबंध सौहार्दपूर्ण ( मैत्रीपूर्ण ) नाहीत हे तुम्ही कसे म्हणू शकता ?

55. भारतीय कृषी व्यवसायाच्या सुधारणेसाठी कोणत्या उपाययोजना केल्या आहेत ?

VIII. 56. भारताचा नकाशा काढून खालील ठिकाणे दाखवा : 1 + 3 = 4

अ) मुंबई

ब) $82\frac{1^{\circ}}{2}$ पूर्व रेखांश

क) कावेरी नदी.

**सूचना : केवल अंध विद्यार्थ्यांकरीता पर्यायी प्रश्न ( प्रश्न संख्या 56 च्या पर्यायी )**

भारतातील लोकांमध्ये हिमालय पर्वताचे उपयोग सांगा. 4